# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा संघ अव्वल

## बुंदेलखंड विद्यापीठ झांशी येथे झाली स्पर्धा

**कार्यालय प्रतिनिधी/ २५ नोव्हेंबर**

**अमरावती :** मध्यविभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा संघ अव्वल ठरला. झांशी येथील बुंदेलखंड विद्यापीठात झालेल्या युवा महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राहिले.



कुलगुरुंसह विद्यापीठाचा विजेता संघ

मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सव २०१५-१६ मध्ये विद्यापीठ संघाने शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) मध्ये तृतीय, शास्त्रीय वाद्य संगीत स्वर वाद्यमध्ये द्वितीय, भारतीय लाइट व्होकलमध्ये द्वितीय, वेस्टर्न व्होकल (सोलो)मध्ये तृतीय, भारतीय समूहगानमध्ये प्रथम, पाश्चिमात्य समूहगानमध्ये द्वितीय, फोक ऑर्केस्ट्रामध्ये प्रथम, शास्त्रीय नृत्यामध्ये तृतीय, फोल्क- ट्रायबल नृत्यामध्ये प्रथम, वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम, स्किट स्पर्धेत द्वितीय, एकांकिका स्पर्धेत द्वितीय, स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत तृतीय स्थान प्राप्त केले. संगीत स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्रथम, नृत्य स्पर्धेत राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर, लिटेररीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, थिएटर स्पर्धेत देवी अहिल्याबाई विद्यापीठ इंदूर, फाइन आर्ट्स स्पर्धेत इंदिरा कला संगीत विद्यापीठ खाकागढ, यांनी अव्वलस्थान मिळवले.

साथीदारांमध्ये चंद्रकांत शिंदे, प्रशांत ठाकरे, प्रकाश मेश्राम, अभिजित भावे, अवधूत पाटील, ॲड. सतीश उपाध्याय यांचा समावेश आहे, तर चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. रजनी देशमुख, प्रा. निखिलेश नलोडे यांचा समावेश होता. युवा महोत्सवात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या चमूचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी कुलगुरू कार्यालयात कौतुक केले.

फाइनआर्ट स्पर्धेमध्ये गायत्री ठाकरे, सूरज लकडे, वादविवाद-वक्तृत्व स्पर्धेत भीमकीर्ती बारसे, अनिरुद्ध महाजन, वेस्टर्न सोलो स्पर्धेत पूर्वा जामनिक, शास्त्रीय गायन स्पर्धेत शुभम पांडे, सुगम संगीत स्पर्धेत कु. वाचस्पती चंदेल, शास्त्रीय वाद्य संगीत तालवाद्य सौरभ देवधर, स्वर वाद्य स्पर्धेत अजित खंडारे, समूहगान (भारतीय) स्पर्धेत प्रणीता वाकोडे, अंकिता पिहुलकर, कु. वाचस्पती चंदेल, अंबिका ठाकरे यांचा समावेश होता, तर शास्त्रीय नृत्यस्पर्धेत कृतिका काणे, समूहनृत्य कृतिका काणे, प्राची ढोके, अश्विनी गुंबळे, पूनम केकन, मिताली चव्हाण, मेघना गायधरे, नेहा डोंगरकर, राणी गणवीर, दीपाली निर्वाण, पाश्चिमात्य समूहगान - नेहा सावके, अर्चना वानखडे, फोक ऑर्केस्ट्रा -शुभम उदावंत, विजया खंडारे, विशाल पांडे, स्किट-माइम स्पर्धेत दीपक नांदगावकर, आरती धनुषकर, अंकुश गवई, गीत बुरंगे, अश्विनी लांजेवार, पवन पवार, प्राची खेडेकर यांचा समावेश आहे.

क्राईम वार्ता